जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २०४ | मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


# थेऊर येथील कारखान्याची १२४ एकर जमीन खाजगी कंपनीला भाडेपट्ट्याने?

## आसवणी प्रकल्पासह कारखान्याचे भंगार विकण्याचा काही संचालकांचा डाव? संचालक मंडळातच 'दुही'

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. १६ : थेऊर (ता. हवेली) येथील श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याची १०० एकर जमीन पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला विक्री करण्याचा व्यवहार आधीच वादाच्या भोवऱ्यात अडकलेला असताना, आता अध्यक्षउपाध्यक्ष व काही संचालक मिळून कारखान्याची उर्वरित १२४ एकर जमीन भाडेपट्ट्याने देणे आणि आसवणी प्रकल्पासह कारखान्याची सामग्री विकण्याचा घाट घालत असल्याची चर्चा समोर आली आहे. ही चर्चा बाहेर नव्हे, तर खुद्द संचालक मंडळातच जोरदार रंगली आहे. त्यामुळे सभासदांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

यशवंत साखर कारखान्याकडे मूळतः सुमारे २४८ एकर जमीन मालकीची होती. त्यापैकी कर्जफेडीसाठी २४ एकर जमीन आधीच एका खासगी कंपनीला विकण्यात आली आहे. बँका,




सभासद, कर्मचारी व इतर देणी भागवण्यासाठी आता १०० एकर जमीन बाजार समितीला विकण्यात येणार आहे. तर सोमवारी (ता.१६) झालेल्या कारखान्याची मासिक बैठकीत कारखाना पुनर्जीवित करण्याऐवजी जमीन विक्री, गोडाऊन भाड्याने देणे, प्लांट स्क्रॅपमध्ये विकणे आणि उर्वरित १२४ एकर जमीन भाडेपट्ट्याने देण्याचा काही संचालक मंडळाने घाट घातला आहे. अशी चर्चा आहे.

विशेष म्हणजे, १०० एकर जमिनीचा व्यवहार महसूल विभागाच्या क्लिअरन्स अभावी प्रलंबित असतानाच, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्याच महिन्यात स्पष्ट आदेश देत परवानगीशिवाय कोणताही व्यवहार करू नये असे बजावले होते. तरीही उर्वरित१२५ एकर जमीन भाड्याने देण्याबाबत हालचाली सुरू असल्याने, सर्व नियम धाब्यावर बसवून काही संचालक मंडळ थेट सभासदांच्या भवितव्यावर घाला घालत असल्याचा आरोप तीव्र होत आहे. दरम्यान, २३ जानेवारी २०२६ रोजी

### संचालकांच्या खिशात जाणार कोट्यवधी रुपये?

सभासदांमध्ये सध्या एकच प्रश्न घुमतो आहे . कारखाना चालवायचा नाही, फक्त मालमत्ता विकून काही संचालक स्वतःचा फायदा करून घेणार का? भंगार विक्रीतून कोट्यवधींचे आर्थिक व्यवहार होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ संचालक मंडळालाच होणार असल्याची जोरदार चर्चा आहे. पुढील प्रोसिडिंगमध्ये हे सर्व निर्णय अधिकृत मंजुरीसाठी मांडले जाणार असल्याची माहिती आहे. हा डाव वेळीच उधळला नाही, तर उद्या संपूर्ण कारखानाच विकून खाते साफ केले जाईल, अशी भीती सभासद व्यक्त करत आहेत.

> हे सर्व आरोप बिनबुडाचे असून यामध्ये काहीही तथ्य नाही. पुणे सोलापूर महामार्गाचे काम थोड्या दिवसातच सुरु होणार आहे. कामाचे टेंडर मिळविलेल्या कंपनीला साहित्य व गाड्या लावण्यासाठी १०० ते १२५ एकर जागा लागणार आहे. आपल्या कारखान्याचा फायदा होईल? त्यादृष्टीने एका संचालकाने मासिक बैठकीत वरील विषय मांडला आहे. परंतु, यावर कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे सभासदांना गोंधळून जाण्यासारखे काहीही कारण नाही.
>
> - **सुभाष जगताप,** (अध्यक्ष-यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर, ता. हवेली)

कारखाना अधिकृतपणे संचालक मंडळाच्या ताब्यात आल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच भंगार, जमीन आणि मालमत्तेचे निर्णय झपाट्याने घेतले जात आहेत. हजारो सभासद, कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकरी कारखाना सुरू होईल या आशेवर वाट पाहत आहेत. मात्र कारखाना सुरू करण्यावर एक शब्द नाही. पण विक्री आणि भाडेपट्ट्यावर जमीन देण्याच्या हालचाली झपाट्याने दिसून येत आहे. अशी चर्चा संचालक मंडळामध्ये सुरु आहे.

## संक्षिप्त

### निगडीत गांजा बाळगणाऱ्या मजुराला अटक

**पिंपरी, ता. १६ :** निगडी परिसरात बेकायदेशीरपणे गांजा बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी एका मजुराला रंगेहात पकडून अटक केली आहे. ही कारवाई शनिवारी (ता. १४) रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास ट्रान्सपोर्ट नगर, निगडी येथे करण्यात आली.या प्रकरणी पोलीस शिपाई विकास जनार्दन रेड्डी यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुनील संपत म्हस्के(४४, बालाजीनगर, भोसरी; मूळ रा. केसापुरी कॅम्प, माजलगाव, बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रान्सपोर्ट नगरमधील बीएजी बिल्डिंग जवळ एका शेडच्या बाजूला आरोपी संशयास्पद रित्या थांबला होता. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ११ हजार ६०० रुपये किमतीचा २३२ ग्रॅम गांजा मिळून आला. अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला असून निगडी पोलीस तपास करत आहेत.

### अल्पवयीनांकडून दोन पिस्तुलांसह चार काडतुसे जप्त

**पुणे, ता. १६ :** खून प्रकरणात प्रतिस्पर्धी टोळीकडून हल्ला होण्याची भीती वाटल्याने देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या दोन अल्पवयीनांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तुले, तसेच चार काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली. तीन महिन्यांपूर्वी झालेल्या खून प्रकरणात अल्पवयीनाला ताब्यात घेण्यात आले होते. खून झालेल्या तरुणाचे साथीदार हल्ला करण्याची भीती अल्पवयीनाला वाटली होती. त्यामुळे अल्पवयीन आणि त्याच्या मित्राने पिस्तूल बाळगले होते. दोघांविरुद्ध यापूर्वी गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. दोघे जण विठ्ठलवाडीतील नदीपात्रात थांबल्याची माहिती सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी विनायक मोहिते आणि सागर शेडगे यांना मिळाली. नदीपात्रातील स्मशानभूमीजवळ सापळा लावून अल्पवयीन आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राला पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिसांनी दोघांची झडती घेतली. तेव्हा त्यांच्याकडे देशी बनावटीची दोन पिस्तुले आणि चार काडतुसे सापडली. बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी दोघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# खेळता-खेळता खोल खड्ड्यात तीन वर्षांची चिमुकली कोसळली

**पुणे, ता. १६ :** वाकड येथील पिंक सिटी रोडवरील अश्वनी गॅलक्सी सोसायटीमध्ये खेळत असताना एका तीन वर्षांच्या चिमुकलीचा भीषण अपघात झाला आहे. सोसायटी परिसरात असलेल्या पार्किंग पिटला कोणतीही सुरक्षा नसल्याने ही बालिका थेट १५ फुट खोल खड्ड्यात पडली. या दुर्घटनेत तिच्या डोक्याला व पाठीला गंभीर दुखापत झाली असून सध्या तिच्यावर उपचार सुरू आहेत.

श्रीजा अनिल सांगळे (वय ३ वर्षे ९ महिने) ही इतर मुलांसोबत गार्डनमध्ये शनिवारी (ता. १४ फेब्रुवारी) रात्री साडेनऊच्या सुमारास खेळत होती. याच गार्डनलगत एफ-विंगचे पार्किंग पिट आहे. धक्कादायक बाब म्हणजे या खड्ड्याभोवती ना संरक्षक भिंत, ना कठडा, ना साधी जाळी पूर्णपणे असुरक्षित अवस्थेत तो उघडाच होता. खेळण्याच्या




ओघात श्रीजा थेट या अर्धवट बांधकाम असलेल्या खड्ड्यात कोसळली.

या घटनेनंतर सोसायटीत एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तातडीने मुलीला रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने जीवितहानी टळली असली, तरी निष्काळजीपणाचा हा गंभीर प्रकार असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून अश्वनी पॅराडाईज कंपनीचा बिल्डर तसेच किंग मल्टीलेव्हल कार पार्किंग सिस्टम चे संचालक जगन्नाथ राऊत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्किंग परिसरात आवश्यक सुरक्षा उपाय न केल्यामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# नायगाव येथील हॉटेल मालकावर गोळीबारचा प्रयत्न?

**उरुळी कांचन, ता. १६ :** नायगाव (ता. हवेली) हद्दीतील प्रयागधाम ते पेठ रोड परिसरात असलेल्या कबीर चायनिज सेंटर येथे एका अज्ञात इसमाने हॉटेल मालकावर बंदूक रोखून गोळीबाराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना नुकतीच उघडकीस आली आहे. बुधवारी (ता. ०४ फेब्रुवारी) सायंकाळी साडेसातच्या सुमारास हि घटना घडली असून बंदुकीतून गोळी न निघाल्याने मोठी जीवितहानी टळली.

मिलिंद बापू शेलार (वय-३८, व्यवसाय शेती व हॉटेल, रा. नायगाव, ता. हवेली) असे हॉटेल मालकाचे नाव आहे. याप्रकरणी मिलिंद शेलार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात तीन इसमांविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा गुरुवारी (ता. १२) दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिलिंद शेलार यांचे नायगाव हद्दीतील प्रयागधाम ते पेठ रोडचे कडेला मागील १५ दिवसांपूर्वीच कबीर चायनिज सेंटर नावाने हॉटेल सुरु केले आहे. बुधवारी (ता. ०४ फेब्रुवारी) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास मिलिंद शेलार हे हॉटेलमध्ये असताना बाहेर एक युनिकॉर्न मोटारसायकलवरून तीन अनोळखी इसम आले होते.

त्यापैकी एका इसमाने हॉटेलमध्ये येऊन थम्सअप व पाण्याची बाटली मागितली. त्याने ४० रुपये दिल्यानंतर मालकाने थम्सअप दिले व पाण्याची बाटली आणण्यासाठी मागे वळताच खाडखाड असा आवाज आला. मागे वळून पाहिले असता संबंधित इसमाने बंदूक रोखून गोळी झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र बंदूक निकामी ठरल्याने गोळी बाहेर आली नाही.

# पुणे पोलिसांकडून ४ कोटींच्या एमडी ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश; सहा अटकेत

**पुणे, ता. १६ :** अमली पदार्थांच्या आंतरराज्यीय साखळीवर मोठा घाव घालत पुणे पोलिसांनी तब्बल ४ कोटी रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त करत संपूर्ण रॅकेट उघडकीस आणले आहे. या कारवाईत एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली असून, राजस्थानपर्यंत पसरलेली ही साखळी पोलिसांच्या जाळ्यात अडकली आहे.

काही दिवसांपूर्वी खराडी परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत १२ लाख रुपयांचे २७ ग्रॅम एमडी जप्त झाले होते. या प्राथमिक कारवाईनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. चौकशीतून आरोपींचे धागेदोरे थेट जोधपुर (राजस्थान) येथे असल्याचे स्पष्ट झाले.

त्याआधारे पुणे पोलिसांच्या



विशेष पथकाने जोधपूरमध्ये धाडसी छापेमारी करत या रॅकेटचा मुख्य सूत्रधार रामकरण जाट याला अटक केली. याचबरोबर पुण्यात विविध ठिकाणी समन्वयित कारवाया करून इतर आरोपींनाही जेरबंद करण्यात आले. या संयुक्त मोहिमेत एकूण १ किलो ९६० ग्रॅम एमडी अमली पदार्थ पोलिसांच्या ताब्यात आला आहे.

पोलिस सूत्रांनुसार, हे अमली पदार्थ नेमके किती जणांपर्यंत पोहोचले, त्याचे वितरण जाळे किती मोठे आहे आणि खरेदीदार कोण आहेत. याचा सखोल तपास सुरू आहे. आर्थिक व्यवहार, मोबाईल कॉल रेकॉर्ड, वाहतूक मार्ग आणि संपर्क साखळी यांची बारकाईने पडताळणी केली जात असून, आणखी अटक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, पुणे शहरात वाढत चाललेल्या ड्रग्स तस्करीविरोधात ही कारवाई महत्त्वाची मानली जात असून, पुणे पोलिसांच्या या निर्णायक धडाकेबाज कारवाईमुळे आंतरराज्यीय ड्रग्स नेटवर्कला मोठा धक्का बसला आहे.

# बिबवेवाडीत भिंत कोसळून बांधकाम मजुराचा मृत्यू

**पुणे, ता. १६ :** भिंत कोसळून बांधकाम मजुराचा मृत्यू झाल्याची घटना बिबवेवाडीतील अप्पर इंदिरानगर परिसरात घडली. मजुराला सुरक्षाविषयक साधने उपलब्ध करुन न देता दुर्घटनेस जबाबदार ठरल्या प्रकरणी ठेकेदाराविरुद्ध बिबवेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

मिथुन नारायण चव्हाण (वय-३४, रा. महावीरनगर, सुखसागरनगर, कात्रज) असे मृत्युमुखी पडलेल्या बांधकाम मजुराचे नाव आहे. या प्रकरणी ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चव्हाण यांची पत्नी श्रीदेवी (वय-२१, मूळ रा. किनीमोड तांडा, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) हिने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबवेवाडीतील अप्पर इंदिरानगर परिसरात एका घराचे बांधकाम सुरू होते. हे काम ठेकेदार राठोड याला देण्यात आले होते.



भिंत पाडण्याचे काम सुरू असताना अचानक भिंत कोसळली.

राडारोड्याखाली सापडून बांधकाम मजूर चव्हाण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. बांधकाम मजुराच्या सुरक्षेविषयक उपाययोजना न करणे, तसेच सुरक्षाविषयक साधने उपलब्ध करुन न दिल्या प्रकरणी ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक कांबळे तपास करत आहेत.

# धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्यस्मृती जागवण्यासाठी बलिदान मास

**पिंपरी-चिंचवड, ता. १६ :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ दरवर्षी साजरा होणारा बलिदान मास यावेळी १८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने पाळण्यात येणार आहे. तसेच, शिव-शंभू विचारांची पिढी घडवण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित नगरसेवक आणि आजी-माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बलिदान मास जनजागृतीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे, महापौर रवि लांडगे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमांचे नियोजन, जनजागृती मोहिमेची रूपरेषा आणि युवकांसाठी प्रेरणादायी उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा झाली.

फाल्गुन अमावस्येला (इ.स. १६८९) संभाजी महाराजांनी मुघल बादशाह औरंगजेबाच्या कैदेत अमानुष छळ सहन करत स्वराज्य आणि धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. संगमेश्वर येथील सरदेसाईंच्या वाड्यात पकडल्यापासून ते भिमा-भामा-इंद्रायणीच्या तीरावर मृत्यूला सामोरे जाण्यापर्यंत त्यांनी दाखवलेले धैर्य व शौर्य आजही प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ



चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांनी मुघलांच्या आक्रमणांना प्रतिकार केला आणि छळ सहन करूनही स्वराज्य व धर्माशी तडजोड केली नाही. या त्यागामुळे त्यांना धर्मवीर म्हणून गौरवण्यात आले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, युवकांसाठी व्याख्यानमाला, इतिहास स्पर्धा व धर्मवीर आदर्शांच्या आधारे त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रसारित केला जातो. सोशल मीडियावर सत्य इतिहास व सकारात्मक संदेश प्रसारित करण्यावर भर देण्यात येणार आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा महत्त्वाचा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.

**बलिदान मासाचे उद्दिष्ट**

इतिहासाची जाणीव व राष्ट्रनिष्ठा दृढ करणे. युवकांना शौर्य, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची प्रेरणा देणे. सामाजिक ऐक्य व समाजोपयोगी कार्यांना चालना देणे, असा उद्देश आहे. तसेच, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अभिवादन, व्याख्यानमाला व इतिहासपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व अन्नदान, विद्यार्थ्यांसाठी निबंध/भाषण स्पर्धा, माहितीपर प्रदर्शने व जनजागृती मोहिमा, व्यक्तिगत आणि सामाजिक आचरण याचा समावेश आहे. दररोज महाराजांना अभिवादन व इतिहास वाचन, व्यसनमुक्त जीवनशैली, शिस्तबद्ध व सुसंस्कृत वर्तन, धर्म आणि राष्ट्राचा आदर राखणे यावर विशेष भर दिला जातो. समाजोपयोगी उपक्रमात सहभाग, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्थानिक ऐतिहासिक स्थळांची जतन व स्वच्छता या कामांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

> धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मृतीला आपण साजरे करून, युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि समाजोपयोगी भावनेची जाणीव निर्माण करू. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून, प्रत्येक मराठी माणसासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नाही, तर तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा काळ आहे. हिंदुभूण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल.यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### हरिश्चंद्र गडावरील महादेवाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या तुरणाचा दरड कोसळून मृत्यू

**जुन्नर, ता. १६ :** ऐतिहासिक हरिश्चंद्र गडावरील केदारेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या एका तरुण भाविकाचा अंगावर दगड कोसळून मृत्यू झाला. ओतूर जवळील घोडेगाव येथील सुरेश डामसे (३५) असे या मृत भाविकाचे नाव असून, या घटनेमुळे ट्रेकर्स आणि भाविकांमध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे. महाशिवरात्रीनिमित्त रविवारी हरिश्चंद्रगडावर भाविकांची मोठी मांदियाळी होती. सुरेश डामसे हे देखील श्रद्धेपोटी गडावर दर्शनासाठी गेले होते. सकाळी मंदिरात दर्शन घेऊन त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला. जुन्नर दरवाजाच्या अवघड वाटेने खाली उतरत असताना अचानक डोंगराचा एक मोठा भाग निखळला. हा दगड थेट सुरेश यांच्या डोक्यावर आदळला. घाव इतका भीषण होता की, त्यांचा जागीच मृत्यू झाला. हरिश्चंद्रगडाचा जुन्नर दरवाजा हा मार्ग ट्रेकिंगसाठी आव्हानात्मक मानला जातो. थोडीशी हालचाल किंवा वाऱ्याचा वेगही दरड कोसळण्यास कारणीभूत ठरू शकतो. दरम्यान, नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

### येरवडा येथे मित्रानेच केला मित्राचा खून

**पुणे, ता. १६ :** पुण्याच्या येरवडा भागात एका झालेल्या किरकोळ वादातून एकाने आपल्याच जिवलग मित्राचा खून केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. माशाक गाझीबक्ष विजापुरे (४०) असे या घटनेत मृत्यू झालेल्या दुर्दैवी व्यक्तीचे नाव आहे, तर पोलिसांनी आरोपी गणेश वसंत शिंदे याला अवघ्या काही तासांत बेड्या ठोकल्या आहेत. शनिवारी दुपारच्या सुमारास कामराजनगर परिसरात माशाक आणि गणेश हे दोघे एकत्र बसून मद्यपान करत होते. सुरुवातीला हसण्या-खिदळण्यात सुरू असलेल्या या मैफिलीत अचानक ठिणगी पडली. दारूची नशा चढल्यानंतर दोघांमध्ये किरकोळ कारणावरून बाचाबाची सुरू झाली. वादाचे रूपांतर भांडणात झाले आणि रागाच्या भरात गणेशचा स्वतःवरील ताबा सुटला. त्याने जवळच पडलेले एक लाकडी दांडका उचलला आणि थेट माशाकच्या डोक्यावर प्रहार केला. घाव इतका जोरदार होता की, माशाक रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि जागीच बेशुद्ध झाला. धक्कादायक म्हणजे, राग शांत झाल्यावर गणेशने मित्राला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला, पण तो उठला नाही. गणेश घाबरला आणि तिथून पसार झाला. दरम्यान, पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी याप्रकरणी अधिक तपास करून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

### निगडीत बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर छापा; पाच जणांवर कारवाई

**निगडी, ता. १६ :** निगडी परिसरातील अंजठानगर, चिंचवड येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई करत पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत जुगाराचे साहित्य तसेच २,२८० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. रविवारी (ता. १५) सायंकाळी साडेसातच्या सुमारास सीएनजी पंपाच्या विरुद्ध बाजूस मोकळ्या जागेत काही व्यक्ती पैशावर तीन पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे रात्री सव्वा अकरा वाजता छापा टाकण्यात आला. या छाप्यात भिमा दत्ता कांबळे (वय ३३), हनुमंत महादेव जाधव (वय ४०), भागवत मारुती शिंदे (वय ४८), संदेश लिंबाजी खोपी (वय ३८) आणि अक्षय विजय येकाडे (वय २१) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपींना बीएनएस कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. सदर कारवाई निगडी पोलीस ठाणे येथील पोलीस अंमलदार विशाल रंगनाथ म्हस्केयांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

### एका क्षणात आपण सगळे पोरके झालो; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावूक



**बारामती, ता. १६ :** मला आयुष्यात वाटलं नव्हतं की मी इथे तुमच्याशी बोलेल. परंतु एका क्षणात आपण पोरकेझालो. अशा शब्दात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांपुढे बोलताना आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. गेल्या दोन दिवसापासून सुनेत्रा पवार या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर निवडून आलेल्या आपल्या पक्षातील सदस्यांशी संवाद साधत आहेत. बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सदस्यांबरोबर त्यांनी बारामती मध्ये संवाद साधला यावेळी बोलताना सुनेत्रा पवार भाऊक झाल्या. त्या म्हणाल्या, एका क्षणामध्ये आपण पोरकेझालो. अजित दादांनी जीवाचे रान करून पक्ष वाढवला. मला आयुष्यात वाटलं नव्हतं की मी इथे तुमच्याशी बोलेल. अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर प्रथमच त्या नवनिर्वाचित सदस्यांसमोर बोलल्या.

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भागीदारी निश्चित; सहा हजार कोटींच्या कर्जास मंत्रिमंडळाची मंजुरी

**पुणे, ता. १६ :** पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भागीदारीची रचना निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (सिडको) यांचा सर्वाधिक ५१ टक्के हिस्सा राहणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचे प्रत्येकी १५ टक्के समभाग निश्चित करण्यात आले आहेत, तर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) यांचा १९ टक्के वाटा असेल.

पुरंदर तालुक्यातील विमानतळासाठी आवश्यक भूसंपादनासाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या निधीची गरज भासणार आहे. हा निधी कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिला जाणार असून, राज्य मंत्रिमंडळाने या कर्ज प्रस्तावास मंजुरी दिली आहे. त्यामुळे विमानतळ प्रकल्पाला गती देण्यासाठी निधी उपलब्ध करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्रकल्पासाठी विशेष हेतू कंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या एसपीव्हीमध्ये एमआयडीसी, एमएडीसी, सिडको तसेच पीएमआरडीए यांचा समावेश असेल. सात वर्षांपूर्वीच संयुक्त कंपनी स्थापन करण्याचा निर्णय जाहीरि झाला होता. त्यावेळी विमानतळ उभारणीची जबाबदारी एमएडीसीकडे सोपवण्यात आली होती आणि त्यांना नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्याच आदेशानुसार सिडकोचा ५१ टक्के, एमआयडीसी आणि पीएमआरडीएचा प्रत्येकी १५ टक्के तसेच एमएडीसीचा १९ टक्के वाटा निश्चित करण्यात आला होता. एमएडीसीने त्यांच्या १९ टक्के हिस्स्यानुसार सुमारे ७६० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता दिली होती. त्यामुळे कर्ज परतफेडीची जबाबदारीही आता स्पष्ट झाली आहे. विमानतळासाठी भूसंपादनाची अंतिम जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर असली तरी, एमआयडीसीला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केल्याने त्यांच्या माध्यमातून भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. एसपीव्हीच्या अध्यक्षपदी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक असतील, तर एमएडीसीचे व्यवस्थापकीय संचालक उपाध्यक्ष असतील.

दरम्यान, याशिवाय वित्त व उद्योग विभागाचे मुख्य सचिव, नगरविकास व विमानचलन विभागाचे प्रधान सचिव, एमआयडीसी व पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच एमएडीसीचे कार्यकारी संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी हे संचालक मंडळावर असणार आहेत.



## पुणे विमानतळावर भारत टॅक्सीची सुरुवात; निश्चित दरामुळे प्रवाशांना दिलासा

**पुणे, ता. १६ :** पुणे विमानतळावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी दिलासादायक पाऊल उचलत भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या पुढाकाराने भारत टॅक्सी ही नवीन व किफायतशीर टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली आहे. सध्या ही सेवा प्रायोगिक तत्त्वावर सुरू असून, देशातील निवडक ११ विमानतळांमध्ये पुण्याची निवड करण्यात आली आहे.




या सेवेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे निश्चित दर पद्धत. गर्दीची वेळ असो किंवा मध्यरात्रीचा प्रवास भाड्यात कोणतीही वाढ होणार नाही. प्रति किलोमीटर ठराविक दरानेच शुल्क आकारले जाणार असल्याने प्रवाशांना प्रवासापूर्वीच अंदाजे खर्चाची स्पष्ट माहिती मिळणार आहे. त्यामुळे पारदर्शकता वाढून अतिरिक्त भाड्याच्या तक्रारींना आळा बसण्याची अपेक्षा आहे.

ही सेवा राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ यांच्या माध्यमातून चालवली जाणार आहे. या योजनेअंतर्गत वाहनचालक स्वतः गाडीचे मालक असणे बंधनकारक आहे. त्यामुळे एजंट किंवा मध्यस्थांना कमिशन द्यावे लागणार नाही आणि संपूर्ण उत्पन्न थेट चालक-मालकाकडे जाणार आहे. यामुळे चालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रवाशांसाठी वापरण्यास सोपे मोबाइल ॲपही विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे टॅक्सी बुकिंग, भाडे तपशील व प्रवासाची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. वाढत्या टॅक्सी भाड्यांच्या तक्रारी लक्षात घेऊन ५ फेब्रुवारीपासून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रायोगिक टप्प्यात पुण्यासह राजकोट, पटना, वडोदरा, भुज, छत्रपती संभाजीनगर, सुरत, कानपूर, वाराणसी, आग्रा आणि प्रयागराज या शहरांतील विमानतळांवर ही सेवा सुरू करण्यात येत आहे. दरम्यान, या निर्णयामुळे विमानतळावरील प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि परवडणारा होईल प्रवाशांकडून या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे.

## भिगवणमध्ये मध्यरात्री धावती कार अचानक पेटली

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १६ : पुणे-सोलापूर महामार्गावर भिगवण येथील 'बिल्ट' कंपनीच्या मटेरियल गेटजवळ मध्यरात्री एका धावत्या वोल्वो कारने अचानक पेट घेतला. रात्री साधारण एक वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. प्राथमिक अंदाजानुसार, तांत्रिक बिघाडामुळे ही आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.


रात्री एकच्या सुमारास कार मटेरियल गेटजवळून जात असताना इंजिनमधून धूर निघू लागला आणि काही क्षणातच कारने पेट घेतला. आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखून गाडी बाजूला उभी केली आणि बाहेर उडी घेतली, ज्यामुळे मोठी जीवितहानी टळली.



घटनेची माहिती मिळताच रुग्णवाहिका आणि भिगवण पोलीस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तसेच, अग्निशमन दलाच्या गाडीला पाचारण करण्यात आले. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, या भीषण आगीत कारचे प्रचंड नुकसान झाले असून गाडीचा सांगाडाच उरला आहे. सुदैवाने, या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. आगीचे नेमके तांत्रिक कारण शोधण्यासाठी भिगवण पोलीस पुढील तपास करत आहेत.

## हडपसर ते दिवेघाट मार्ग आज तीन तास बंद

**पुणे, ता. १६ :** पुणे-सासवड रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. दिवेघाटात रस्ता रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामांतर्गत डोंगर फोडण्यासाठी आज मंगळवारी (ता. १६) 'ब्लास्टिंग' (स्फोट) करण्यात येणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव या काळात दिवेघाटातील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली जाणार आहे. आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाअंतर्गत हे काम पूर्ण केले जात आहे.



भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, ब्लास्टिंग दुपारी करण्यात येणार आहे. त्यामुळे सकाळी अकरा ते दुपारी दोन या तीन तासांच्या कालावधीत हडपसर ते दिवेघाट दरम्यानची सर्व प्रकारची वाहतूक थांबवण्यात येईल. या काळात घाटात मोठ्या प्रमाणात दगड आणि ढिगारे कोसळण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

जुना रस्ता अरुंद असल्याने दिवेघाटात अनेकदा वाहतूक कोंडी आणि अपघातांचे सत्र सुरू असते. हा मार्ग आता प्रशस्त आणि 'फोर लेन' केला जात आहे. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.

पर्यायी मार्ग : हडपसर-सासवड प्रवासासाठी नागरिक बोपदेव घाट किंवा हडपसर-लोणी काळभोर-उरुळी कांचन-जेजुरी या पर्यायी मार्गांचा वापर करू शकतात. ब्लास्टिंगच्या कामामुळे दुपारी दोन नंतरही काही काळ वाहतूक संथ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शक्य असल्यास सकाळी ११ च्या आधी किंवा दुपारी तीन नंतर प्रवासाचे नियोजन करावे. प्रशासनाकडून होत असलेल्या या विकासकामात नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पुणे शहर वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज ठाकरे पुण्यात दर आठवड्याला घेणार कामाचा आढावा

**पुणे, ता. १६ :** महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकांच्या निकालांनी राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवली आहे. एकेकाळी मनसेला भरभरून साथ देणाऱ्या पुणेकरांनी यंदा मात्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनाच्या पदरी शून्य यश टाकले आहे. २९ पैकी २२ महापालिकांत खातेही न उघडता आल्याने पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी थेट पुण्यात बैठक घेत नेत्यांची आणि पदाधिकाऱ्यांची जोरदार शाळा घेतली.

एकेकाळी पुणे महापालिकेत मनसेचे तब्बल २९ नगरसेवक होते आणि पक्ष निर्णायक भूमिकेत होता. मात्र २०२६ च्या निवडणुकीत ही आकडेवारी थेट शून्यावर आली. शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांच्यासारख्या प्रमुख नेत्यालाही पराभवाचा सामना करावा लागला.



नाशिकमध्येही पक्षाला अवघी एकच जागा मिळाल्याने संघटनात्मक मरगळ उघड झाली आहे.

पुण्यात झालेल्या बैठकीत राज ठाकरे यांनी पराभूत उमेदवारांना थेट सवाल केला निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि आखलेली रणनीती प्रत्यक्षात का उतरली नाही? जनसंपर्कातील कमतरता, संघटनात्मक शिथिलता आणि कार्यकर्त्यांची निष्क्रियता ही पराभवाची प्रमुख कारणे असल्याचे विश्लेषण समोर येत आहे. मुंबईतही ठाकरे ब्रँडची पकड सैल होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राज ठाकरे यांनी ऐतिहासिक निर्णय घेत आता दर आठवड्याला पुण्यातील कामाचा स्वतः आढावा घेण्याची घोषणा केली आहे. मुंबईतून आदेश देण्याऐवजी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदाधिकाऱ्यांच्या कामाचा हिशोब घेतला जाणार आहे. त्यामुळे निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना आता मैदानात उतरल्याशिवाय पर्याय उरणार नाही. पराभवातून सावरण्यासाठी पुण्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचे आदेश देण्यात आले असून, पक्षबांधणीसाठी नव्याने रणनीती आखली जाणार असल्याचे संकेत आहेत.

## वीस दिवसानंतरही कोणतीही कारवाई नाही, त्यामुळे संशय बळावतोय

### आमदर रोहित पवार यांचे ट्विट करत संशय व्यक्त

**पुणे, ता. १६ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुतणे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी त्यावर घातपाताची शक्यता व्यक्त करत केंद्रीय तपास संस्थांकडून चौकशी व्हावी अशी मागणी केली होती. दरम्यान अजित पवार यांच्या मृत्यूला वीस दिवस झाले तरी अद्याप तड्ठ कंपनीवर कारवाई झालेली नाही तसेच ऊक्कड्ड ने देखील चौकशी अहवाल दिलेला नाही. त्यावरून रोहित पवार यांनी ट्विट करत संशय बळावत असल्याचे म्हटले आहे.



स्व.दादांच्या दुर्दैवी अपघाताचा आज विसावा दिवस असून अद्यापही DGC कडून प्राथमिक चौकशी अहवाल आलेला नाही, तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या VSR कंपनीविरोधात देखील काहीही कारवाई अद्यापर्यंत झालेली नाही, परिणामी शंका अधिक बळावत चालल्या आहेत. त्यामुळे DGC ने लवकरात लवकर प्राथमिक चौकशी अहवाल द्यावा तसेच तड्ठ वर योग्य ती कारवाई करावी, असे रोहित पवार यांनी ट्विट केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची केंद्रीय तपास संस्थांकडून चौकशी केली जावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केली होती. त्यानंतर केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोकडून (एएआयबी) या अपघाताची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

## बसमधील महिला प्रवाशांचे दागिने चोरणारे दोन सराईत गुन्हेगार जेरबंद

### सहकारनगर पोलिसांची मोठी कारवाई

**अमित मुंडीक**

पुणे, ता. १६ : सार्वजनिक बसमधील गर्दीचा फायदा घेत प्रवाशांना लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात सहकारनगर पोलिसांना यश आले आहे. पीएमपीएमएल बसमध्ये एका महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी चोरणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून २ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




सप्टेंबर महिन्यात एक महिला भोसरी ते बालाजीनगर असा बस प्रवास करत होत्या. बसमध्ये प्रचंड गर्दी होती, याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी अतिशय चालाखीने त्यांच्या उजव्या हातातील सोन्याची बांगडी लंपास केली. बसमधून उतरल्यावर हा प्रकार लक्षात येताच महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली होती.

या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस हवालदार अमोल पवार यांना आपल्या गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. तांत्रिक तपासात ही चोरी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार गोविंद गायकवाड आणि त्याच्या साथीदाराने केल्याचे स्पष्ट झाले. तपासादरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली की, मुख्य आरोपी गोविंद गायकवाड हा आधीच सिंधुदुर्गमधील एका गुन्ह्यात ओरस येथील जिल्हा कारागृहात बंद होता. पोलिसांनी तात्काळ हालचाली करत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि गोविंदसह त्याचा साथीदार वैभव गायकवाड (दोघेही रा. मुंढवा) याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली.

गोविंद गायकवाड याच्यावर खुनाचा प्रयत्नाचे ३, मारामारीचा १ व चोरीचे ९ असे एकूण १३ गुन्हे, तर वैभव गायकवाड याच्यावर खुनाचा प्रयत्न १, जबरी चोरी १ व चोरी २ असे एकूण ४ गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त धन्यकुमार घोडसे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केली.

# दौंड येथे टेम्पोची दुचाकीला पाठीमागून धडक; एकाचा जागीच मृत्यू, एक जखमी

**दौंड, ता. १६ :** सेवा रस्त्यावरून निघालेल्या दुचाकीला इंडियन ऑईल गॅसच्या टेम्पोने पाठीमागून दिलेल्या धडकेत दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. पांढरेवाडी, मुकादमवाडी (ता. दौंड गावचे हद्दीतील इटरनेस प्रा. लि. कँपनीचे पाठीमागील सेवा रस्त्यावर शनिवारी (ता. १४) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

भरत संतोष जाधव (रा. मळद ता. दौड जि. पुणे) असे अपघातात मृत्यू झालेल्या इसमाचे नाव आहे. तर स्वप्नील दत्तात्रय सुतार (वय-२१, व्यवसाय शेती, रा. मळद, ता. दौंड) असे जखमी दुचाकी चालकाचे नाव आहे. स्वप्नील सुतार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार इंडियन ऑईल गॅसच्या टेम्पो चालक चंद्रकांत आसराजी शेंबडे (रा. धाखंटा ता. गेवराई जि. बीड) याच्यावर दौंड पोलीस ठाण्यात




गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (ता. १४) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पांढरेवाडी गावचे हददीत इटरनेस प्रा. लि. कंपनीचे पाठीमागे सर्विस रोडवर स्वप्नील सुतार व भरत जाधव हे दोघेजण कुंजीरवाडी येथून चहा पत्ती घेवुन मळदकडे दुचाकी मोटार सायकलवरून निघाले होते.

यावेळी पाठीमागुन आयरश कंपनीचा इंडियण ऑईल गॅसचा टेम्पो नं चक/१०/एग/९१११ हि वरील चालक चंद्रकांत शेंबडे याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवून वाहतुकीच्या नियमनाकडे दुर्लक्ष करून मोटर सायकलला पाठीमागुन जोरात धडक दिली. या अपघातात भरत जाधव याचे डोकीस, पोटावर, हाता-पायाला गंभीर व किरकोळ दुखापतीस होवुन मयत झाला. तर स्वप्नील सुतार यांना किरकोळ गंभीर व किरकोळ दुखापत झाली. तसेच मोटर सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे.

दरम्यान, याप्रकरणी आरोपी वाहन चालक चंद्रकांत शेंबडे याच्यावर दौंड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(र), १२५(ल), ३२४(४) तसेच मोटर वाहन अधिनियम १९८८ कलम १८४, १३४, १७७ नुसार कारवाई करण्यात आली आहे. तपास पोलीस हवालदार पठाण करीत आहेत

# सोलापुरात अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन मित्रांचा जागीच मृत्यू

**सोलापूर, ता. १६ :** सोलापूर शहरात आज पहाटेच्या सुमारास एक अत्यंत भीषण घटना घडली आहे. शहरातील प्रसिद्ध रूपाभवानी मंदिर परिसरात एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोराची धडक दिली. हा अपघात इतका भयानक होता की, यामध्ये दुचाकीवरील तीन तरुणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटने मुळे संपूर्ण सोलापूर शहरात मोठी खळबळ उडाली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात आज पहाटे ४ च्या सुमारास झाला. मृत तिन्ही तरुण एकाच दुचाकीवरून प्रवास करत होते. रूपाभवानी मंदिर परिसरातील रस्त्यावरून जात असताना एका



भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. धडक इतकी जोरात होती की तिन्ही तरुण रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. पहाटेची वेळ असल्या मुळे रस्त्यावर लोकांची वर्दळ खूप कमी होती, मात्र अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील काही नागरिक तातडीने मदतीसाठी धावून आले.

या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणांची नावे नागेच गवंडी, रोहन पोरे आणि बसवराज चनशेट्टी अशी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हे तिन्ही तरुण ऐन उमेदीच्या वयातील होते. त्यांच्या अशा अचानक जाण्यामुळे गवंडी, पोरे आणि चनशेट्टी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. एकाच वेळी तीन तरुणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच सोलापूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा आढावा घेऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले आहेत. अपघात केल्यानंतर संबंधित अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे.

हा प्रकार हिट अँड रनचा असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. दरम्यान, सध्या पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून त्या आधारे फरार वाहनचालकाचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सोलापूर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# पुण्यात गुन्हे शाखेकडून ३४ किलो गांजासह आलिशान कार जप्त

**पुणे, ता. १ :** पुणे शहरात अंमली पदार्थविरोधी मोहिमेत मोठी कामगिरी करत पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत गुन्हे शाखा युनिट ०५ च्या पथकाने ३४ किलो ४८० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गांजाची वाहतूक करण्यासाठी वापरलेली आलिशान कार, मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा एकूण १४ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेष सूचनांनुसार शहरातील अंमली पदार्थांच्या विक्रीवर लक्ष ठेवण्यात येत होते. त्यानुसार १४ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हे शाखा युनिट ०५



चे पोलीस निरीक्षक संदीपान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पथक गस्त घालत असताना कोंढवा परिसरात संशयास्पद हालचाली दिसून आल्या. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संशयित कारची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणावर गांजा आढळून आला.

अक्षय पोपटराव पाडुळे (वय ३९) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो पुणे व मुंबई परिसरात विविध गुन्ह्यांमध्ये संशयित असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. जप्त केलेला गांजा विक्रीसाठी आणला असल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

या प्रकरणी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीकडील अंमली पदार्थांचा पुरवठा साखळी, त्यामागील नेटवर्क आणि संभाव्य साथीदारांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. शहरात अंमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला असून, अशा बेकायदेशीर कृत्यांवर आळा घालण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यातील ग्रामपंचायती २० फेब्रुवारीला बंद; अखिल भारतीय सरपंच परिषदेचे राज्यव्यापी आंदोलन

**पुणे, ता. १६ :** राज्यातील ग्राम पंचायत स्तरावरील विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी राज्यभरातील ग्रामपंचायती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अखिल भारतीय सरपंच परिषद यांनी याबाबत माहिती देत राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. या दिवशी सर्व ग्रामपंचायती एकदिवसीय लाक्षणिक संपावर जाणार असून गावगाड्याचा कारभार ठप्प राहणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील १६ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपलेली आहे किंवा संपत आली आहे. अनेक ठिकाणी निवडणुका न घेता शासकीय कर्मचारी प्रशासक म्हणून नेमण्यात आले आहेत. त्यामुळे गावांच्या




विकासकामांवर परिणाम होत असून लोकप्रतिनिधींना काम करण्याची संधी मिळत नसल्याचा आरोप सरपंच परिषदेने केला आहे. शासनाच्या या धोरणाविरोधात आंदोलन करण्यात येणार असून परिषदेचे संस्थापक अध्यक्ष जयंत पाटील यांनी ही घोषणा केली आहे. या आंदोलनातून काही महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात येणार आहेत. जिल्हा नियोजन समितीत ग्रामपंचायतींचा प्रतिनिधी समाविष्ट करावा, सरपंच आणि उपसरपंच यांचे थकीत मानधन तातडीने देण्यात यावे, विधान परिषद निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार मिळावा, तसेच ग्रामपंचायतींमधील कॉम्प्युटर ऑपरेटरांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा, अशा प्रमुख मागण्या आहेत. याशिवाय ग्राम पंचायतींच्या अधिकारात वाढ करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, ग्रामपंचायती बंद राहिल्यामुळे गावपातळीवरील अनेक कामे रखडण्याची शक्यता आहे. जन्म दाखले, मृत्यू दाखले, कर भरणा, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विकासकामांशी संबंधित सेवा काही काळासाठी प्रभावित होऊ शकतात. या आंदोलनानंतर शासन काय भूमिका घेते आणि मागण्यांवर काय निर्णय घेतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## मूगाची खिचडी सकाळी नाष्ट्यामध्ये का खायला हवी, जाणून घ्या

मूग डाळ ही सर्वात सहज पचणारी डाळ म्हणून ओळखली जाते. यामध्ये प्रथिने, फायबर आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. या डाळीमध्ये लोह देखील असते, म्हणून ज्यांना अशक्तपणाचा त्रास आहे त्यांनी मूग डाळीची खिचडी नक्कीच खावी. मूग डाळीच्या खिचडीमध्ये टोफुमिसळला तर त्याचे आरोग्य फायदे दुप्पट होतील. सोया आणि पनीरपासून बनवलेले टोफुव्हिटॅमिन बी १२ ने समृद्ध आहे, जे तुमच्या शरीरातील व्हिटॅमिन बीची कमतरता भरून काढण्यास मदत करू शकते.

मूग डाळीच्या खिचडीमध्ये तूप नक्की घालायला हवे. यामुळे आपल्या शरीरात निरोगी चरबीचे प्रमाण वाढते. यामुळे आपली पचनसंस्था मजबूत ठेवण्यास मदत होते. तसेच आपण दिवसभर उर्जावान राहतो.

तूप आणि टोफुघालण्याव्यतिरिक्त, मूग डाळीच्या खिचडीमध्ये आले, हळद, जिरे, ताज्या भाज्या देखील घालता येतील. यामुळे मूग डाळ खिचडी आणखी पौष्टिक होईल.

मूग डाळ खिचडी खाण्याचे फायदे : मूग डाळ खिचडी खाल्ल्याने शरीरात चांगल्या चरबीचे प्रमाण वाढते. यामुळे पोट हलके राहण्यास देखील मदत होते आणि पचनसंस्था सुधारते.

मुगाची डाळ ही प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि निरोगी चरबीचा देखील चांगला स्रोत आहे. मुगाची खिचडी हृदयाच्या आरोग्यासाठी देखील चांगली मानली जाते. शिवाय, ते रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

मूगातील जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात, ज्यामुळे तुमच्या शरीराची संक्रमण आणि रोगांशी लढण्याची क्षमता वाढते.

सकाळी नाश्त्यात तुम्ही मूग डाळ खिचडी खाऊ शकता, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर ऊर्जा मिळेल.

# पार्थ पवार राजकारणात पुन्हा सक्रिय गाठीभेटी सुरू, संधी मिळणार का?

**पुणे, ता. १६ :** मावळ लोकसभा मतदार संघात २०१९ मध्ये निवडून येवून राजकारणाचा श्रीगणेशा करण्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ज्येष्ठ चिरंजीव पार्थ पवार यांचे स्वप्न भंग पावल्याने गेल्या पाच ते सहा वर्षांपासून राजकारणापासून दूर असणारे पार्थ पवार हे पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांनी आता नागरिकांशी गाठीभेटी घेत लोकसंपर्काला सुरूवात केल्याने अजित पवार यांचा राजकारणाचा वारसा पार्थ पवार यांच्याकडे देण्याच्यादृष्टीने हालचाली सुरू झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

पार्थ पवार यांचा सक्रिय राजकारणाचा प्रारंभ हा मावळ लोकसभा मतदार संघात पराभवाने झाला. अजित पवार यांचे प्राबल्य असलेल्या पिंपरी चिंचवड परिसरातील मावळ लोकसभा मतदार संघात च्या लोकसभा निवडणुकीत पार्थ पवार यांचा पराभव झाला. त्यामुळे त्यांना राजकारणात आणण्याचे अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे स्वप्न भंगले. तेव्हापासून पार्थ पवार हे विजनवासात होते. नुकत्याच उघडकीस आलेल्या मुंढवा जमीन विक्री प्रकरणानंतर ते चर्चेत आले. अजित पवार यांच्या निधनानंतर पार्थ पवार हे पुन्हा एकदा राजकारणात सक्रिय झाल्याचे दिसून येऊ लागले आहेत. नागरिकांशी संवाद साधणे, राजकीय व्यक्तींच्या गाठीभेटी घेत आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे आठवड्यातील सहा दिवस राज्यभर दौऱ्यावर असायचे. मात्र, रविवारचा एक दिवस ते बारामतीसाठी द्यायचे.



बारामतीत दर रविवारी ते नागरिकांच्या भेटी घेण्याबरोबरच सुरू असलेल्या प्रकल्पांची पाहणी करायचे. या पाहणी दौऱ्यामध्ये संबंधित अधिकारीही असायचे. एखाद्या ठिकाणी जावून पाहणी करताना त्रूटी आढळल्यास त्याविषयी ते अधिकाऱ्यांना जाब विचारायचे. त्यामुळे विकासकामे करताना अधिकारीही सतर्क असायचे. बारामतीत विकासकामे करताना त्याचा दर्जा चांगला राहील, याकडे अजित पवार यांना कटाक्ष असायचा. मात्र, त्यांच्या अकाली निधनानंतर बारामतीतील अजित पवार यांचे दौरे थांबले.

अजित पवार यांच्या कामाची ही प्रथा आता पार्थ पवार यांनी सुरू केली आहे. रविवारी पार्थ पवार यांनी बारामतीतील विकासकामांचा पहिला पाहणी दौरा केला. कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांनी बारामतीतीत विकास कामांची पाहणी केली. वन विभागातील बटरफ्लाय गार्डन, डव्हेंचर पार्क आणि काम सुरू असलेल्या शिवसृष्टी प्रकल्पाची पाहणी केली. त्यावेळी अजित पवार यांच्या प्रमाणेच त्यांनीही प्रत्येक प्रकल्पाबाबत माहिती घेतली. त्यामुळे पार्थ पवार हे आता पुन्हा राजकारणात सक्रिय झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री पदी नियुक्ती झाल्यामुळे राज्यसभेत एक जागा रिक्त झाली आहे. या ठिकाणी पार्थ पवार यांना संधी मिळणार का? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदार संघात पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. या निवडणुकीचीही प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू झाली आहे.

## चिंचवडमध्ये पत्त्याचा जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर कारवाई

**चिंचवड, ता. १६ :** मोकळ्या जागेत तीन पत्ती नावाचा जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली आहे. ही घटना रविवारी (ता. १५) संध्याकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास अजंठानगर, चिंचवड येथे घडली.

या प्रकरणी पोलीस शिपाई विशाल रंगनाथ म्हस्के यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी पाच जणांना नोटीस दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी सार्वजनिक ठिकाणी पैसे लावून पत्त्यांचा जुगार खेळत होते. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तिथे छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी जुगाराचे साहित्य आणि हजार रुपये रोख जप्त केले आहेत. निगडी पोलीस तपास करत आहेत.

# शिवाजी महाराज–टिपू सुलतान तुलना

## हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याने राज्यात राजकीय वाद पेटला

**मुंबई, ता. १६ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याच्या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. विविध राजकीय पक्ष, हिंदुत्ववादी संघटना आणि शिवप्रेमींकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून सपकाळ यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

वादाची सुरुवात मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतान यांचा फोटो लावण्यात आल्याने झाली. हिंदुत्ववादी संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर संबंधित फोटो हटवण्यात आला. त्यानंतर प्रतिक्रिया देताना



सपकाळ यांनी ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला, त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनीही काम केले, असे विधान केले. याच वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनाने या विधानाचा तीव्र निषेध नोंदवत सपकाळ यांनी महाराष्ट्राची आणि शिवप्रेमींची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. तसेच भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनाच्या नेत्यांनीही सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. प्रकरण अधिक चिघळल्यानंतर पुणे येथील पर्वती पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, सपकाळ यांनी सोशल मीडियावर स्पष्टीकरण देत आपले वक्तव्य संदर्भाबाहेर नेण्यात आल्याचा आरोप केला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर राज्यात तणाव निर्माण करण्याचा आरोप करत आपल्या विधानाची मोडतोड झाल्याचे म्हटले आहे.

हा वाद केवळ दोन ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या तुलनेपुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील भावनिक आणि राजकीय समीकरणांशी जोडलेला आहे. शिवाजी महाराज हे राज्याचे आराध्य दैवत मानले जात असल्याने अशा तुलनांमुळे सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या प्रकरणाचे राजकीय पडसाद अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## भाजप नगरसेविकेच्या पतीवर जीवघेणा हल्ला

**नागपूर, ता. १६ :** नागपूर शहरात एक धक्कादायक घटना समोर आली असून कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाजपच्या एका नगरसेविकेच्या पतीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या निखिल सिमले यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका तलावाजवळ घडली. निखिल सिमले आणि महेश ऊर्फ सोनू गणेश ठाकरे हे दोघे जुने मित्र असल्याचे सांगितले जात आहे. या दोघांमध्ये जुन्या वादाच्या कारणावरून बाचाबाची झाली. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही वेळातच हा वाद हिंसक झाला. रागाच्या भरात महेश



ठाकरे याने धारदार चाकूने निखिल सिमले यांच्या छातीवर आणि पोटावर वार केले. या हल्ल्यात निखिल सिमले गंभीर जखमी होऊन खाली कोसळले.

या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे जखमी निखिल सिमले आणि आरोपी महेश ठाकरे हे दोघेही यापूर्वी एका गाजलेल्या हत्याकांड प्रकरणात सहआरोपी होते. त्या गुन्ह्यातून दोघांचीही निर्दोष सुटका झाली होती. एकेकाळी जवळचे मित्र असलेल्या या दोघांमध्ये पुन्हा वाद का निर्माण झाला आणि तो इतका टोकाला कसा गेला, याचा तपास पोलीस करत आहेत.


## मुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टर–मध्ये तांत्रिक बिघाड?

### उड्डाणानंतर क्षणभर नियंत्रण सुटले

**मध्य प्रदेश, ता. १६ :** राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच मध्य प्रदेश मध्ये घडलेल्या हेलिकॉप्टर घटनेने हवाई सुरक्षेबाबत नव्याने चर्चा सुरू केली आहे. मोहन यादव यांच्या हेलिकॉप्टरने उड्डाण घेतल्यानंतर काही क्षण नियंत्रण गमावल्याची घटना समोर आली आहे.

खंडवा जिल्ह्यातील पंधना येथे लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमासाठी जात असताना ही घटना घडली. उड्डाणानंतर हेलिकॉप्टर काही क्षण हवेत अस्थिर झाले. पुढे सरकण्याऐवजी ते मागील दिशेला झुकल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अनपेक्षित हालचालीमुळे उपस्थित नागरिक आणि सुरक्षा यंत्रणेत क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले.

सुदैवाने वैमानिकाने प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टरवर नियंत्रण मिळवले आणि काही वेळातच ते सुरक्षितपणे मार्गस्थ झाले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मुख्यमंत्री सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात अजित पवार यांच्या



कथित विमान अपघाताबाबत संशय व्यक्त होत असतानाच आमदार रोहित पवार यांनी घातपाताची शक्यता वर्तवली होती. त्या पार्श्वभूमीवर ही घटना अधिकच चर्चेत आली आहे.

तज्ज्ञांच्या मते, व्हीआयपी उड्डाणांसाठी स्वतंत्र सुरक्षा प्रोटोकॉल असतात. उड्डाणपूर्वी तांत्रिक तपासणी, हवामानाचा अचूक अंदाज, तसेच वैमानिकांचे विशेष प्रशिक्षण या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. अशा घटनांमुळे हवाई सुरक्षेची अंमलबजावणी कितपत काटेकोरपणे होते, यावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राजकीय नेत्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी आता अधिक जोर धरत असून, या घटनेचा सविस्तर अहवाल सार्वजनिक करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राशिद खानचा वर्ल्ड रेकॉर्ड; टी–२० क्रिकेटमध्ये ७०० विकेट्सचा गाठला पल्ला

**कोलंबो, ता. १६ :** अफगाणिस्तानचा फिरकी जादूगार आणि कर्णधार राशिद खानने टी-२० विश्वचषकात यूएईविरुद्धच्या सामन्यात जागतिक विक्रम केला आहे. या सामन्यात त्याने क्रिकेटच्या सर्वात छोट्या फॉरमॅटमध्ये एक असा इतिहास रचला आहे, जिथे आजवर जगातील कोणताही गोलंदाज पोहोचू शकलेला नाही. टी-२० क्रिकेटमध्ये ७०० विकेट्सचा पल्ला गाठणारा राशिद खान हा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे.

राशिद खानने टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये यूएई विरुद्धच्या सामन्यात मुहम्मद अरफानला बाद करून त्याने ही ऐतिहासिक कामगिरी केली. राशिद खानने २०१५ मध्ये टी-२० पदार्पण केल्यापासून केवळ ११ वर्षांत हा पल्ला गाठला आहे. त्याने ५१८




सामन्यांत १८.५ च्या सरासरीने आणि ६.५९ च्या उत्कृष्ट इकॉनमी रेटने ७०० विकेट्स मिळवले आहेत. यामध्ये त्याने १८ वेळा चार विकेट्स आणि वेळा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. विशेष म्हणजे, टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही १९१ विकेट्ससह तो अव्वल स्थानी आहे. टी-२० फॉरमॅटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्यांच्या यादीत आता राशिद खान खूप पुढे निघून गेला आहे. या यादीतील इतर चारही खेळाडू निवृत्त झाल्यामुळे राशिदचा हा रेकॉर्ड मोडणे अशक्य दिसत आहे.

## पुणे रेल्वे स्थानकावरून ६४० किलो रानडुक्कराचे मांस जप्त; वनविभागाची कारवाई

**पुणे, ता. १६ :** पनवेल एक्सप्रेसने मडगाव (गोवा) येथे पार्सल मधून पाठवण्यात येणारे ६४० किलो जंगली डुक्कर (रानडुक्कर) याच्या मांसाची तस्करी उघडकीस आली आहे. पुणे वनविभागाने पुणे रेल्वे स्थानकातील पार्सल विभागात धाड टाकून हि कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ७ मोठ्या बॉक्समध्ये भरलेले अंदाजे ६४० किलो मांस जप्त करण्यात आले.

वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे रानडुक्करचे मांस नांदेड येथून पनवेल एक्सप्रेसने मडगाव (गोवा) येथे पाठविण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाला गुप्त सूत्रांनी दिली होती. त्यानुसार वनविभागाच्या टीमने पार्सल विभागातून संशयास्पद बॉक्स ताब्यात घेऊन तपासणी केल्यानंतर ते रानडुक्कराचे मांस



असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून संबंधित आरोपीविरुद्ध विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनुसूची क्र. २ अंतर्गत संरक्षित असलेल्या वन्यजीवांची शिकार करणे व त्यांच्या मांसाची विक्री करणे हा कायद्यानुसार दंडनीय गुन्हा आहे. नागरिकांनी वन्यजीवांबाबत कोणतीही संशयास्पद माहिती मिळाल्यास वनविभागाच्या टोल-फ्री क्रमांक १९२६ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही कारवाई वनसंरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, विभागीय वन अधिकारी अमोल थोरात, आणि विशाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी ऋषीकेश चव्हाण व सुरेश वरक यांच्या नेतृत्वाखाली वनपाल प्रमोद रासकर, श्रीमती शितल खंडके, वनरक्षक मनोज पारखे, पोलिस कॉन्स्टेबल अमोल मोटे व वनरक्षक प्रिया वाकडे आदी अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

## उरुळी कांचन येथे कौटुंबिक वादातून सासऱ्याकडून जावयाला मारहाण

### पत्नीसह तिघांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. १६ :** घरगुती भांडणाच्या रागातून सासऱ्याने जावयाला शिवीगाळ करुन खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील ढगेमळा परिसरात गुरुवारी (ता. १२) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी पत्नीसह तिघांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पत्नी गौरी किरण कांचन (रा. ढगे मळा, उरुळी कांचन, ता. हवेली) सासरे अशोक तिकोने (पूर्ण नाव माहित नाही) व अशोक तिकोने याचा मित्र राजू शिनगारे (रा. दोघेही अप्पर इंदिरानगर, उरुळी कांचन, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी किरण रखमाजी कांचन (वय -३५, रा. ढगेमळा,




उरुळी कांचन) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ३

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी किरण कांचन हे त्यांच्या राहत्या घरी असताना त्यांची पत्नी गौरी कांचन, सासरे अशोक तिकोने, तसेच राजू शिनगारे हे त्यांच्या घरी आले. यावेळी सर्वांनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सासरे अशोक तिकोने यांनी खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने उजव्या पायाच्या नडगीवर वार केला. मारहाणीनंतर संबंधित आरोपी तेथून निघून गेले. जखमी अवस्थेत किरण कांचन यांनी त्यांच्या आईला फोन करून माहिती दिली. त्यानंतर त्यांना रुग्णवाहिकेद्वारे उरुळी कांचन येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. एक्स-रे तपासणीत उजव्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, वरील तिघांवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११५(२), ११८(१) व ३५२ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तपास पोलीस हवालदार सलीम शेख करीत आहेत.

# बारामती येथे महाशिवरात्री यात्रेदरम्यान होम गार्ड जवानाला मारहाण; एकावर गुन्हा दाखल


गोरख जाधव

डोर्लेवाडी, ता. १६ : बारामती येथे महाशिवरात्री यात्रेदरम्यान कर्तव्य बजावत असलेल्या वर्दीधारी होमगार्ड जवानावर झालेल्या मारहाणीच्या घटनेने शहरात संतापाची लाट उसळली आहे. सार्वजनिक बंदोबस्तात कार्यरत असलेल्या जवानावर हात उगारणे ही केवळ वैयक्तिक वादाची बाब नसून कायदा-सुव्यवस्थेला थेट आव्हान असल्याची तीव्र प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे.

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(१), ११५ (२), ३५१ (२) (३), ३५२ प्रमाणे विकास दादा लोंढे (रा. अनंतनगर आमराई, ता. बारामती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. वाहतूक नियंत्रणासाठी बॅरेकेटिंग करून वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली होती. त्या ठिकाणी होमगार्ड जवान सिद्धार्थ भारत शिंदे हे अधिकृत गणवेशात आपले कर्तव्य बजावत होते.

आरोपीने मोटारसायकल आत नेण्याचा प्रयत्न केला. नियम समजावून




सांगितल्यानंतर त्याने शिवीगाळ करत धमकी दिली व प्रत्यक्ष मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. होमगार्ड दल हे पोलीस दलाचे पूरक सहाय्यक बल असून आपत्ती व्यवस्थापन, कायदा-सुव्यवस्था व सार्वजनिक बंदोबस्तात त्यांची महत्त्वाची भूमिका असते. कायद्यानुसार ते लोकसेवक या श्रेणीत मोडतात. त्यामुळे कर्तव्यात अडथळा आणणे किंवा बलप्रयोग करणे हा दंडनीय गुन्हा ठरतो.

दरम्यान, पोलीस प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकारी किंवा होम गार्ड जवानांवर हल्ला करणाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान ही भूमिका अधोरेखित करत शून्य सहनशीलता धोरणानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

शहरातील राजकीय-सामाजिक वातावरणात नेतृत्वातील बदलांच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी दादागिरीची मानसिकता पुन्हा डोकेवर काढत असल्याची चर्चा रंगत असली, तरी कायद्याचा धाक आणि त्वरित कारवाईमुळे अशा प्रवृत्तीला आळा बसेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. यात्रा, उत्सव आणि गर्दीच्या काळात पोलीस व होमगार्ड दलास सहकार्य करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

दरम्यान, आपत्कालीन सेवा देणाऱ्या जवानांचा सन्मान राखणे आणि नियमांचे पालन करणे, यामुळेच सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राहू शकते. या घटनेमुळे बारामतीत कायदा-सुव्यवस्थेबाबत सजगता वाढली असून, प्रशासनाच्या शून्य सहनशीलता भूमिकेची खरी परीक्षा आता पुढील कारवाईत दिसून येणार आहे.